# राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
## महाराष्ट्र राज्य, पुणे.

रासनिप्रा

जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, ५ बी. जे. रोड,पुणे - ४११००१.
फोन नं. - (०२०) २६०५०६४१ मेल आयडी - sccapune@gmail.com


**निवडणूक महत्वाचे**

जा. क्र. रासनिप्रा/कक्ष-११/ नांदेड जिमसबँक/नि.कार्य.मंजूरी/ २२१६ /२०२६
दिनांक १६ /०६/२०२६

**वाचावे:-**

१. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ७३ कब
२. महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४
३. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-ब अधिसुचना दिनांक ०६.०८.२०१८ रोजी प्रसिध्द झालेले महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) (प्रथम सुधारणा) नियम २०१७
४. कक्ष अधिकारी, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील आदेश क्रमांक सनित- १६२५/प्र.क्र.९०/१३ स, दिनांक ०५.१२.२०२५
५. प्राधिकरणाकडील जा.क्र. रासनिप्रा/कक्ष-११/निवडणूक स्थ./शासन आदेश/५२२६/२०२५ दि.५.१२.२०२५
६. कक्ष अधिकारी, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील आदेश क्रमांक सनित- १६२५/प्र.क्र.२०१/१३ स, दिनांक २३.०२.२०२६
७. प्राधिकरणाकडील आदेश जा.क्र.रासनिप्रा/कक्ष-११/निवडणूका सुरु करणे/आदेश/७२५/२०२६ दिनांक २४.०२.२०२६
८. प्राधिकरणाकडील आदेश जा.क्र.रासनिप्रा/कक्ष-११/नांदेड जिमसबँक/निनिअ आदेश /१९४१/२०२६ दिनांक २९.०५.२०२६
९. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांचेकडील पत्र जा.क्र.अर्थ-३/निवडणूक/नांजिमस बँक निवडणूक/कार्यक्रम/१३२५/२०२६, दिनांक १५.०६.२०२६

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य,पुणे

**प्रस्तावना:-**

ज्या अर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे ७३ कब मधील तरतुदीस अनुसरुन दिनांक ३०/०३/२०१३ रोजी अधिसूचनेद्वारे राज्य सहकारी संस्थांच्या निवडणुकांचे अधिक्षण, निर्देशन, संचालन व नियंत्रण याची जबाबदारी प्राधिकरणावर आहे. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ नियम ३ (v) नुसार राज्यातील संचालक मंडळाची मुदत संपलेल्या सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रिया सुरु करणेचे घोषणा /आदेश जिल्हा/ तालुका / वार्ड सहकारी निवडणूक अधिकारी यांना उपरोक्त वाचावे क्रमांक २ व ३ मधील तरतूदीनुसार दिलेले आहेत. आणि,

ज्या अर्थी, शासनाकडील वाचावे क्र. ४ च्या आदेशानुसार, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ७३कक मधील तरतुदीनुसार राज्यात सध्या सुरू असलेल्या नगरपालिका व नगरपंचायतींच्या निवडणुका तसेच येऊ घातलेल्या इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभुमीवर, ज्या प्रकरणी सहकारी संस्थेची निवडणूक घेण्याबाबत मा.उच्च न्यायालय/मा. सर्वोच्च न्यायालयाने आदेशीत केले आहे अशा सहकारी संस्था वगळून राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणूका (सहकारी गृहनिर्माण संस्था वगळून) शासन आदेशाच्या दिनांकापासून सध्या ज्या टप्प्यावर आहेत त्या टप्प्यावर राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका पूर्ण होईपर्यंत पुढे ढकललेल्या आहेत. तसेच शासनाने मुद्दा क्र. ५ अन्वये मतदार यादी प्रसिध्दीचा टप्पा सुरु असलेल्या संस्था (अशा संस्थांची अंतिम मतदार यादी प्रसिध्द होईपर्यंत कार्यवाही चालु ठेवता येईल) अशी सुट दिलेली आहे. सदर बाब प्राधिकरणाने वाचावे क्र. ५ अन्वये सर्व जिल्हा/तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांना अवगत केलेली आहे. आणि,

ज्या अर्थी, शासनाकडील वाचावे क्र. ६ चे पत्रान्वये राज्य निवडणूक आयोगाद्वारे राज्यातील १२ जिल्हा परिषद व १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणूका जाहीर करण्यात आल्या होत्या. त्याअनुषंगाने दिनांक १०.०२.२०२६ पर्यंत राज्यातील

१२ जिल्हा परिषद व १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणूका पार पडल्या आहेत. सद्यस्थितीत राज्यात उर्वरित स्थानिक स्वराज्य संस्थांचा निवडणूक कार्यक्रम अद्याप जाहीर झाला नसल्याने राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणूका तात्काळ सुरू करणेबाबत प्राधिकरणास विनंती केलेली आहे. आणि,

ज्या अर्थी, प्राधिकरणाने वाचावे क्र.७ चे आदेशान्वये शासनाने पुढे ढकललेल्या सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रिया सुरु करणे, टप्पा क्र. १ ते ई-१ सन २०२५ मधील प्रलंबित सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रिया सुरू करणे, प्रलंबित सहकारी संस्थांच्या निवडणूकांकरीता अर्हता दिनांक निश्चित करणे, तसेच ई-१ सन २०२६ मध्ये निवडणूकीस पात्र होणाऱ्या सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रिया सुरू केलेल्या आहेत. आणि,

ज्या अर्थी, जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांनी **नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. नांदेड** या संस्थेची **प्रारूप मतदार यादी दिनांक ०४.०५.२०२६** रोजी व **अंतिम मतदार यादी दिनांक २९.०५.२०२६** रोजी प्रसिध्द केलेली आहे. आणि,

ज्या अर्थी, जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांनी विनंती केलेनुसार प्राधिकरणाने वाचावे क्र. ८ चे आदेशान्वये उक्त बँकेच्या निवडणूकीकरीता **श्री. शाहूराज हिरे, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड** यांची निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नेमणूक केलेली आहे. आणि,

ज्या अर्थी, जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांनी वाचावे क्र. ९ चे पत्रान्वये उक्त संस्थेचा निवडणूक कार्यक्रम प्राधिकरणाच्या मान्यतेस्तव सादर केलेला आहे. आणि,

ज्या अर्थी, निवडणूक नियम १८ नुसार निवडणूक कार्यक्रमास प्राधिकरणाने मान्यता देणेची तरतुद आहे. आणि,

त्या अर्थी, प्राधिकरण उक्त निवडणूक कार्यक्रमाबाबत पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

## -: आदेश:-

महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चा नियम १८ नुसार प्राधिकरणास प्राप्त झालेल्या अधिकारानुसार **नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. नांदेड**_या संस्थेचा सोबत जोडलेल्या "परिशिष्ट- अ" प्रमाणे निवडणूक कार्यक्रम मंजूर करीत आहे.

**मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मान्यतेने.**

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१

(अशोक गाडे)
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रति :-**

१. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, लातूर.
२. श्री. शाहूराज हिरे, निवडणूक निर्णय अधिकारी, नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. नांदेड तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नांदेड

२/- यांनी जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांच्या मार्गदर्शनानुसार, अधिनियम, नियम व संस्थेचे मंजुर उपविधीनुसार निवडणूक प्रक्रिया पार पाडून तसा अहवाल जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांचेमार्फत सादर करावा.

**प्रत माहितीस्तव :-**

नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. नांदेड

नमुना इ-४ [ महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ चे नियम १८ पहा]

निवडणूक निर्णय अधिकारी - श्री. शाहुराज हिरे, पदनाम - जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था, नांदेड

सहकारी संस्थेचे नाव :- नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. नांदेड

महाराष्ट्र सहकारी संस्था निवडणूक नियम २०१४ च्या नियम १८ प्रमाणे अधिकाराचा वापर करुन आणि मा. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, पुणे व मा.जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी, तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांनी जाहीर केलेल्या उपरोक्त सहकारी संस्थेच्या सदस्यांची सन २०२६-२०३१ या कालावधीची निवडणूक घेणेकरीता मी, शाहुराज हिरे, जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था, नांदेड, मा. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, लातूर आणि मा.राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण यांच्या मान्यतेने, नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. नांदेड या संस्थेच्या समिती सदस्यांची निवडणूक घेण्याकरिता नियुक्त केलेला निवडणूक निर्णय अधिकारी, याद्वारे नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. नांदेड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सहकारी संस्थेच्या समितीच्या सदस्यांची निवड करण्यासाठी निवडणुकीच्या कार्यक्रमातील विविध टप्पे तयार करुन जाहीर करीत आहोत आणि यासोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ-२ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मतदार संघाच्या किंवा मतदार संघांच्या संबंधातील निवडणुका नियत करीत आहोत.

अनुसूची

अंतिम मतदार यादी प्रसिध्दी दिनांक : २९/०५/२०२६

| अ. क्र. | मतदार संघाचे नांव | नामनिर्देशनपत्रे दाखल करण्यासाठीचा शेवटचा दिनांक (ज्या जागी नामनिर्देशनपत्रे मिळतील ती जागा) | नामनिर्देशन पत्रांची सुची प्रसिध्दी करणे | नामनिर्देशनपत्राच्या छाननीचा दिनांक आणि वेळ | वैध नामनिर्देशनपत्रांची सुची प्रसिध्द करण्याचा दिनांक | उमेदवाराने नामनिर्देशन पत्रे मागे घेण्याचा दिनांक व वेळ,स्थळ | निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना निशाणीचे वाटप व अंतिम यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | मतदान ज्या दिनांकास घेण्यात येईल तो दिनांक, वेळ व मतदानाचे स्थळ | मतमोजणी दिनांक, वेळ व स्थळ | मतदानाचे निकाल घोषित करण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | अ) प्राथमिक कृषि पतपुरवठा व वि.का. सेवा सहकारी संस्था तसेच धान्य अधिकोष सहकारी संस्था यांचे प्रतिनिधी प्रत्येक तालुक्यास एक या प्रमाणे<br>१.नांदेड- १ ; ९.धर्माबाद - १<br>२. मुदखेड- १ ; १०.हदगाव - १<br>३.अर्धापूर- १ ; ११.हिमायतनगर -१<br>४.कंधार - १ ; १२.भोकर - १<br>५.लोहा- १ ; १३.उमरी- १<br>६.बिलोली- १ ; १४.मुखेड- १<br>७.नायगाव - १ ; १५.किनवट - १<br>८.देगलूर - १ ; १६.माहूर- १<br>ब) नागरी सहकारी बँका, नागरी सह. पतसंस्था, ग्रामिण बिगरशेती पतसंस्था, पगारदार नोकरांच्या सह.पतसंस्था, प्रक्रिया व पणन सहकारी संस्था इ.) मतदार संघ (१)<br>क) वरील प्रमाणे अ, ब मतदार संघात समावेश नसलेल्या इतरसर्व सहकारी संस्था व व्यक्ती समासद (१)<br>अनु.जाती/जमाती प्रतिनिधी - १<br>महिला प्रतिनिधी - २<br>इतर मागासवर्गीय प्रतिनिधी - १<br>भटक्या विमुक्त जाती/जमाती व विशेष मागास प्रवर्ग प्रतिनिधी - १<br>एकुण - २१ | दि. २३/०६/२०२६ ते दि. ३०/०६/२०२६ सकाळी ११ ते दु. ३ वाजेपर्यंत (निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय) | दि. २३/०६/२०२६ ते दि. ३०/०६/२०२६ जसे अर्ज प्राप्त होतील त्याप्रमाणे रोज सायं ४.०० वा. कार्यालयाचे नोटीस बोर्डावर. | दि. ०१/०७/२०२६ सकाळी ११.०० पासून छाननी संपेपर्यंत (निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय) | दि. ०२/०७/२०२६ सकाळी ११ वाजता (निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयाचे नोटीस बोर्डावर) | दि. ०२/०७/२०२६ ते दि. १६/०७/२०२६ वेळ स. ११.०० ते दु. ३.०० वाजेपर्यंत (निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय) | दि. १७/०७/२०२६ स. ११.३० वाजता (निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयाचे नोटीस बोर्डावर | दि. २६/०७/२०२६ वेळ -सकाळी ८.०० ते सायं ५.०० वाजेपर्यंत स्थळ-नियम ६५ अन्वये ठिकाण नंतर जाहिर करण्यात येईल. | दि.२८/०७/२०२६ रोजी सकाळी ९.०० वाजल्यापासून (ठिकाण नंतर जाहिर करण्यात येईल) | दि. २८/०७/२०२६ रोजी मतमोजणी संपलेनंतर लगेच. |

टिप :- १) स्तंभ क्र.६ व ८ मध्ये विनिर्दिष्ट केलेली यादी जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था, नांदेड व वरील बँकेच्या मुख्य कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द केली जाईल. २) मतदार यादी व कोरे नामनिर्देशन पत्र निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात आवश्यक शुल्क भरणा करुन प्राप्त करुन घेता येईल ३) मतदार यादी बँकेच्या https://nandeddcc.org व राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या https://scea.maharashtra.gov.in या वेबसाईटवरुन उपलब्ध करुन घेता येईल. ४) नामनिर्देशन पत्राची छाननी केल्यानंतर त्यांची प्रसिद्धी, मतदान व मतमोजणी दिवस वगळून निवडणूक कार्यक्रम शासकीय/सार्वजनिक सुट्या वगळून सुरू राहील. ५) अटी, शर्ती व सामान्य सुचना या निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात पहावयास मिळतील. ६) निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयाचा पत्ता :- नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., नांदेड, मुख्य कार्यालय : छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्या जवळ, स्टेशन रोड, नांदेड, पिनकोड-४३१६०१

जा.क्र.रासनिआ/कक्ष-अ-वर्ग/नि.का.मंजुरी 2296 /सन २०२६ दि. १६/०६/२०२६

दिनांक :-११.०६.२०२६

(शाहुराज हिरे)
निवडणूक निर्णय अधिकारी
नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. नांदेड

जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी,
तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, लातूर

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य,पुणे-१

(अशोक गाडे)
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण महाराष्ट्र राज्य,पुणे
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य, पुणे

Scanned with OKEN Scanner